महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक/कशिमं/२०२६/पाच/ 1791 दिनांक:- 06 OCT 2026

परिपत्रक

प्रति,
केंद्र प्रमुख तथा मुख्याध्यापक/प्राचार्य.
शासकीय रेखाकला परीक्षा - २०२६ (सर्व)

विषय:- उत्तरपत्रिका विभागीय मूल्यमापन केंद्रावर जमा करण्याबाबत.

शासकीय रेखाकला एलिमेंटरी / इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा - २०२६ ही दि. २८/०९/२०२६ ते दि. ०१/१०/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

परीक्षेच्या पुढील मूल्यमापन प्रक्रियेसाठी आपल्या केंद्रातील सर्व उत्तरपत्रिका व संबंधित कागदपत्रे आपल्या केंद्रास नेमून दिलेल्या मूल्यमापन केंद्रावर दि. ०७/१०/२०२६ ते दि. १२/१०/२०२६ या कालावधीत जमा करावीत. उत्तरपत्रिका जमा करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तयार करण्याबाबत

परीक्षा क्रमांक :- ०१ ते पुढे या क्रमाने उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तयार करावेत. (एलिमेंटरी/ इंटरमिजिएट चे वेगवेगळे गठ्ठे तयार करावे) प्रत्येक गठ्ठा व्यवस्थित सीलबंद केलेला असावा. सीलबंद नसलेले गठ्ठे मूल्यमापन केंद्रावर स्वीकारले जाणार नाहीत, याची सर्व केंद्रप्रमुखांनी नोंद घ्यावी. आवश्यकतेनुसार पुढील गठ्ठ्यांना गठ्ठा क्रमांक उदा: ०३ गठ्ठे असल्यास ०१/०३ , ०२/०३, ०३/०३ इत्यादी क्रमांक द्यावेत.

प्रत्येक उत्तरपत्रिका सिलबंद गठ्ठ्यावर एलिमेंटरी/ इंटरमिजिएट परीक्षेचे नाव नमूद करुन खालील माहिती मोठ्या व स्पष्ट अक्षरात लिहावी

केंद्र क्रमांक	
केंद्र शाळेचे नाव	
एलिमेंटरी/ इंटरमिजिएट	
गठ्ठा क्रमांक	
आसन क्रमांक (पासून पर्यंत)	

२. उत्तरपत्रिकांसोबत खालील कागदपत्रे स्वतंत्रपणे समक्ष हस्तपोच जमा करावीत-

केंद्र शाळेचे कव्हरिंग लेटर, परीक्षार्थी मुळ उपस्थिती पत्रकाची साक्षांकीत झेरॉक्स प्रत (मुळ उपस्थिती पत्रक केंद्र शाळेने जपुन ठेवावे), एलिमेंटरी /इंटरमिजिएट शिल्लक कोऱ्या (वापरलेल्या व न वापरलेल्या) उत्तरपत्रिकांचा अहवाल, व एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा मध्ये अनुपस्थित असलेलल्या विषयाच्या रकान्यामध्ये ऑनलाईन AB केलेल्या निकालपत्रकाची ऑनलाईन एक प्रत जोडावी.

वरील सर्व कागदपत्रांची केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक/प्राचार्यांनी स्वत: पडताळणी करूनच ते मूल्यमापन केंद्रावर जमा करावे.

परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन व निकालाची पुढील प्रक्रिया वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सर्व केंद्रप्रमुखांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून निर्धारित कालावधीत पत्र क्र. कशिमं/२०२६/आठ/१७५२ दिनांक-२४/०९/२०२६ अन्वये देण्यात आलेल्या मूल्यमापन केंद्रावर (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)उत्तरपत्रिका जमा कराव्यात.

मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यातील केंद्र प्रमुखांनी सिलबंद केलेल्या उत्तरपत्रिका पुढील सूचना प्राप्त होईपर्यंत आपल्या अभिरक्षेत सुस्थितीत ठेवावयाच्या आहेत. मूल्यमापन केंद्र उपलब्ध होताच स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(विनोद दांडगे)
संचालक
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रत:- माहितीस्तव अग्रेषित.

१. मा. कला संचालक, कला संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- माहिती व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी.

१. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर, नागपूर.
२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिक्लप महाविद्यालय किल्ले आर्क, छत्रपती संभातीनगर.
३. निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
५. शिक्षण निरीक्षक/ शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद/ शिक्षणाधिकारी निरीक्षक, (सर्व).
६. प्राचार्य, वसई विकासिनीचे दककला महाविद्यालय, नवघर वसई रोड (पूर्व).
७. प्राचार्य ऋषिकेश चित्रकला महाविद्यालय, प्लॉट क्र.४१ सेक्टर १५, नवीन पनवेल.
८. मुख्याध्यापक, श्री शिवाजी विद्यालय, देहुरोड, जि. पुणे.
९. प्राचार्य, नव कृष्ण व्हॅली कला महाविद्यालय, पाटील हौद जवळ, जैन मंदीर, दुसरा मजला, मिरज सांगली.
१०. प्राचार्य, न्यु मॉडेल इंग्लिश मिडीअम स्कूल, नागाळा पार्क, कोल्हापूर.
११. मुख्याध्यापक, अनंत इंग्लिश स्कूल, मंगळवार पेठ शिवाजी उदय मंडळा शेजारी, राजवाडा वजळ, सातारा.
१२. प्राचार्य, ललित कला महाविद्यालय, गंगापुर रोड, नाशिक.
१३. प्राचार्य, चित्रकला महाविद्यालय, जनता कृषी विद्यलयाचे आवार, मोर्शी रोड, अमरावती.
१४. प्राचार्य, बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय, माळी भवन, ज्योती नगर, जठारपेठ, अकोला.
१५. मुख्याध्यापक, श्री. अंबिका माध्यमिक व उच्च विज्ञान विद्यालय केडगांव (देवी) ता. जि. अहिल्यानगर ४१४००५.
१६. प्राचार्य, सहयाद्री स्कुल ऑफ आर्ट, मु.पो. सावर्डे जि. रत्नागिरी.
१७. प्राचार्य, सप्तपुट ललित कला भवन, खिरोदा, जळगांव.
१८. प्राचार्य, स्कुल ऑफ आर्ट, धुळे.
१९. मुख्याध्यापक, श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिव.
२०. प्राचार्य, एस. व्ही. एस. हायस्कुल, अक्कलकोट रोड, सोलापूर.
२१. निवडनस्ती.